PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 5, ISSUE 1

# महाराष्ट्रातील लोककला

**डॉ. देवयानी व्ही. चव्हाण**
**असोसिएट प्रोफेसर**
**जी. एस. कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड इकॉनॉमिक्स**
**नागपूर (महाराष्ट्र) भारत**

**प्रस्तावनाः-**

महाराष्ट्र हे सांस्कृतिक दृष्ट्या संपन्न असे राज्य आहे. ग्रामीण भागातून आजही विविध समाजगट ही संपन्नता जोपासत आहेत. समाजाच्या विविध गटांतून तयार झालेली गीते, नाचाचे प्रकार, कविता, संकल्पना यांचा समावेश लोककलांमध्ये होतो. लोककला ही लोकनिर्मिती आहे, सांस्कृतिक ठेवा आहे. अध्यात्मिक, धार्मिक, सामाजिक, व्यावसायिक व्यवहाराच्या दृष्टिने मानवीय भावना आणि परस्परसंबंधांशी लोककलांचा संबंध जोडलेला आहे. मानवी जीवन सारणीतील भावनिक आणि व्यावहारिक गरजा, खेळकरपणाने, आनंदप्रदतेने, गांभीर्यपूर्वक पूर्ण करण्याचे कार्य लोककला करतात. सहज रंजन, शिक्षण, प्रबोधन साधण्याचे सामर्थ्य लोककलांमध्ये असते. मानवी जीवन तेथे लोककला असं म्हटल्यास वावगे होणार नाही. लोककला हे लोकजीवनाचे पारंपरिक अभिन्न अंग आहे. लोककलांच्या उगमांचा ‘शोध घेता असे दिसते की लोकजीवनातील जवळ जवळ सर्वच कलांचा उगम यातु श्रद्धेतून झालेला आहे. कालांतराने यातु श्रद्धा गळून धर्मश्रद्धा लोककलात आली. धर्माच्या आणि मंदीराच्या आश्रयाने कलांची जोपासना होऊ लागल्याचे दिसते. नृत्य, संगीत, चित्र, शिल्प, मूर्ती इत्यादी कला, धर्म आणि मंदीर यांच्या आश्रीत बनलेल्या दिसतात. आजही काही विधीच्या प्रसंगी नृत्य, नाट्य, संगीत इत्यादी कलांची जोपासना करताना पाहावयास मिळते.

**संकेतिक शब्दः- लोककला, लोकजीवन, लोककला संकल्पना, लोककला निर्मिती, भावनाविष्कार, लोकरंजन,**

**लोककलेत पुढील प्रकारांचा समावेश होतो.**

**लावणी** :- लावणी म्हणजे ढोलकी-कड्याच्या साहाय्याने लोकरंजनासाठी गायिलेली खटकेबाज ‘शृंगारिक‘रचना, पण त्यासोबतच लौकीक जीवनातील इतरही भावभावनांचा आविष्कार लावणीतून ‘शाहीर घडवितात. लावणी ही आत्मलक्षी स्वरूपाची असते. लावणीची रचना सामान्यतः स्फुट स्वरूपाची असते. काव्यात्मकता व बंदिस्तपणा हा लावणीचा विशेष म्हणता येईल. लावणी वीररस सोडून जीवनाच्या बहुतेक इतर अंगांना स्पर्श करते. लावणी प्रायतः ‘शृंगाररस प्रधान असते. विरह सात्विक ‘शृंगार, नैतिक आणि अनैतिक प्रेम इत्यादी प्रेमाच्या प्रणयाच्या अवस्था लावणीत पाहावयास मिळतात. ‘शृंगाराशिवाय मानवी मनातील इतर भावछटाही लावणी रंगविते. ‘शृंगार हा लावणीचा मुख्य विषय असला तरी याव्यतिरिक्त आध्यात्मिक लावण्या, भेदिक लावण्या, अन्य विषयावरील लावण्या इ. लावण्यांचे प्रकार तमाशात पाहायला

मिळतात. पेशवाईत अनंत फंदी, राम जोशी, प्रभाकर, परशुराम, होनाजीबाळा सारखे प्रतिभावंत शाहीर'झाले. त्यांनी गण, गवळण, पदे, पोवाडे, आणि लावण्या इत्यादी प्रकारच्या रचना केल्या. सण उत्सव प्रसंगी ते आपल्या या विविध रचना फडातून सादर करीत.

**तमाशा** :- अस्सल मराठी वळणाचा लोककला प्रकार म्हणून तमाशा महाराष्ट्रात लोकप्रिय आहे. 'लोकनाट्य' हा तमाशाला पर्यायी शब्द मराठी लोकजीवनात सध्या रूढ झालेला आहे. तमाशा हा 'शब्द वेगवेगळया प्रांतामध्ये वेगवेगळया नावाने वापरला जातो. विदर्भात खडी गंमत, राजस्थानात तमाशा, मराठवाडयात आणि पश्चिम महाराष्ट्रात तमाशा हल्ली लोकनाट्यकला या नावाने ओळखला जातो.तमाशा हा 'शब्द मूळ पर्शियन भाषेतील आहे. तेथून तो उर्दूत आला. उर्दूतून मराठी भाषेत रुढ झाला. तमाशाला पेशवाईच्या काळात आदर मिळाला. पठ्ठेबापूरावांच्या प्ररणेने तमाशात पहिली स्त्री पवळाबाई आली. त्यामुळे अभिनेत्रींना प्रतिष्ठा मिळाली. यामुळे तमाशा हा 'शृंगारीक व कामोत्तेजक झाला. तमाशाला आता थिएटर निर्माण झाली. तमाशा करून दाखविणाचा मंडळींना तमासगीर म्हणतात. सात आठ किंवा त्याहूनही अधिक पात्रांचा एक संच असतो. पेशवाईचा उत्तरकाळ हा तमाशाचा भरभराटीचा काळ असला तरी तो प्रकार महाराष्ट्रात अस्तित्वात होता. तमाशाचे दोन प्रकार आहे.

**१ बारीचा तमाशा** :- हा तमाशा बैठकीतील असतो. यात कलावंतीणी नृत्याभिनयासह एके ठिकाणी बसून आंगिक माध्यमातून लावणी सादर करीत असतात. बारीच्या तमाशात कलाव्रंतीणीने गायीलेले लावणी नाटय असते. यातून चेह्यावरचे हावभाव, मुद्रा, पदन्यास प्रकट होते.+

**२ ढोलकीचा तमाशा** :- यात खडी गंमत हा प्रकार आहे. तमाशा हा महाराष्ट्रात सार्वत्रिक होत असला तरी प्रदेशपरत्वे त्यांच्यामध्ये भिन्नता आढळते. महाराष्ट्रात मराठवाड्यात सादर होणाचा ढोलकी फडाचा तमाशा, विर्दभातला तमाशा उर्फ खडी गंमत, खानदेशी तमाशा आणि पश्चिम महाराष्ट्रातील तमाशा यांचे वेगळेपण उठून दिसते.

**गोंधळ, जागरण, आणि वग :-**

महाराष्ट्रात मंगल प्रसंगी, कुळाचार म्हणून दैवतांचा उपासनेचा एक विधी म्हणून गोंधळ आणि जागरण करण्याची प्रथा काही घराण्यात आहे. देवीच्या उपासनेत गोंधळ्याचा 'गोंधळ' आणि खंडोबाच्या उपासनेत वाघ्या मुरळीचे जागरण यांना विशेष महत्व आहे. उपास्य दैवताचा एक विधी म्हणून तसेच लोकरंजनाचा एक लोककला प्रकार म्हणून या लोकाविष्कार कला प्रकारांना मराठी लोकजीवनात अनन्य साधारण महत्व आहे. या लोककलाप्रकारांना 'विधीनाट्य' असेही म्हटले जाते. गोंधळ आणि जागरणात नृत्य, संगीत आणि अभिनय यांचा मनोहारी मिलाप असतो. यातील गाणी चढ्या स्वरात, कडक वाद्यांच्या संगीत साथीने गायिली जातात. वग म्हणजे संवाद नाट्य. वगात एखाद्या कथानकावर आधारीत स्वयंस्फूर्त संवादातून नाट्य खुलविल्या जाते. वग नाट्य हे तमाशावर केले गेलेले एक कलम आहे. वग नाट्यामुळे नृत्य प्रधान असलेल्या तमाशात नाट्य येऊन अधिक रंगत भरली गेली त्यामुळे तमाशाला लोकप्रियताही लाभली.

**संगीत बारी :-**

पूर्वी राजे महाराजे यांच्या मनोरंजनासाठी नाच गाण्यांचे कार्यक्रम आयोजित केले जात असत. त्यातूनच संगीत बारी अस्तित्वात आली असावी. स्त्रियांच्या नाच प्रधान संगीत बारीचा समावेश तमाशातच करता येतो. अभिनय, नाट्य आणि कथात्म संगीत बारीत आढळत नाही. तर त्यात चार सहा नाची स्त्रिया असून त्यातीलच एक स्त्री या बारीची प्रमुख असते. या प्रमुख स्त्रीच्या नावाने हा फड ओळखला जातो.

**नाच किंवा नाच्या :-**

महाराष्ट्रातील ग्रामीण भागात सुगीच्या दिवसात किंवा जत्रेच्या प्रसंगी उघड्या मैदानावर जो तमाशा चालतो त्याला नाच किंवा नाच्या असे म्हटले जाते. नाच्याच्या या संचात दोन तीन नाची स्त्रिया असून ढोलक वाजविणारा,पेटीवाला,तुणतुणेवाला सुरत्या आणि एक सांगोड्या यांचा समावेश असतो. नाच्याचा हा कार्यक्रम प्रामुख्याने उघड्यावरच सादर केला जातो. प्रेक्षकांच्या आवडी प्रमाणे नाच गाणे होत असल्यामुळे दौलत जादाची प्रथा नाच्यातही पाहावयास मिळते. नाच्याच्या संचात बहुधा खालच्या स्तरातीलच कलावंत असतात. 'त्यातील नाची नाच गायनात तितक्याशा प्रविण नसतात.

**गण :-** मंगलकार्य निर्विघ्न पार पडावे म्हणून कार्यारंभी देवदेवतांची पूजा व त्यांचे स्तवन करण्याची परंपरा प्राचीन आहे. या परंपरेतूनच तमाशात गण आला असावा. गोंधळ जागरण लोकधर्मीनाट्यातही सुरूवातीला गण सादर केला जातो. तमाशाची सुरूवात गणाने होते. तमाशाचा कार्यक्रम निर्विघ्न पार पडू दे अशी विनंती गणपतीला आणि इतर देवदेवतांना यात केली जाते. गण गाण्याची तमासगिरांची विशिष्ट अशी धाटणी असून फक्त पुरूष कलावंतच गण गातात.

**गवळण** :- गवळणीची परंपरा संतवाङ्मयात पाहवयास मिळते. ज्ञानेश्वरापासून ते एकनाथापर्यंतच्या संतांनी गवळणी रचिलेल्या आहेत. अशा गवळणीतून राधाकृष्ण यांच्यातील प्रीतीभावाबरोबरच श्रीकृष्णाच्या लीळांचे वर्णन त्यांनी केलेले आहे. मराठी 'शाहिरी वाङ्मयातही 'शाहीरांनी रचिलेल्या गवळणींची संख्या विपुल आहे. 'शाहिरांच्या गवळणीतून राधाकृष्ण यांच्या प्रीतीभावाच्या आविष्काराबरोबरच त्यांच्यातील 'शृंगाराचेही वर्णन आलेले आहे. संताच्या गवळणीतून भक्तीभाव आणि अध्यात्म यांची गुंफण आहे. तर 'शाहिरांच्या गवळणीत शृंगाररसाला प्राध्यान्य दिलेले आहे.

**भारूड** :- भारूड या 'शब्दाचा इतिहास दोन हजार वर्षा इतका प्राचीन असावा, कारण 'भारूड' 'शब्द महाभारतात सापडतो. 'शकुंतलाख्यानात 'भारूडसामगीता द्वद्व असा 'श्लोक असून दुष्यंतास दिसलेल्या कण्वाश्रमाचे हे वर्णन आहे. यावरून त्याकाळी 'भारूड' हा एक गीतप्रकार होता हे निश्चित दिसते. भारूड हा एक काव्य प्रकार म्हणून प्रारंभापासून लोकप्रिय असावा म्हणून भारूड म्हणजे जे बहुरूढ झाले ते असे म्हटले जाते. लोकसंस्कृतीच्या उपासकांनी आणि काहींनी व्यावसायिक बाब म्हणून भारूडे गाईली. पुढे अध्यात्माच्या प्रसारार्थ एकनाथांसारख्या दूरदर्शी संताने भारूडांचा उपयोग करून घेतला.

**दंडार :-** दंडार या लोककलेचा उगम प्राचीन काळात झाला. 'शेतातील खळयावर अमाप पीक आल्याचे पाहून 'शेतक्यांनी 'शेजारच्या झाडाच्या फांद्या तोडल्या आणि आपल्या मित्रांसह'ते आनंदाने नाचू लागले ही दंडारीची सुरूवात असावी. आजही दिवाळीला गोंड आणि ढिवर अशा प्रकारचे नाच करताना दिसतात. आजही दिवाळीच्या वेळी भाऊबीजेच्या दिवशी गावात मंडईचे आयोजन असते. तिथे मंडईत दंडार सादर केली जाते.

**कीर्तन :-** कथनाच्या स्वाभाविक वृत्तीतून कीर्तन जन्मास आले. कथा गाण्या सुतांपासून ही परंपरा आली. महाराष्ट्रातील कीर्तनकारांनी भारतीय व विशेषतः हिंदु संस्कृतीचे रक्षण केले. महाराष्ट्रातील संतांनी कीर्तनाच्या माध्यमातून धर्मोपदेशाचे आणि सत्प्रचाराचे काम केले. राष्ट्रीय भावनेच्या जागृतीसाठी सुद्धा या कीर्तनाचा उपयोग झाला म्हणून महाराष्ट्रातील पारंपरिक संस्थामध्ये कीर्तनसंस्थेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. परमेश्वर प्राप्तीचा एक उत्तम मार्ग म्हणून नामदेवापासून ते आजपर्यंतच्या संतांनी कीर्तनाचा महिमा गायिला आहे.

थोडक्यात महाराष्ट्राच्या या लोककलाप्रकाराबद्दल महाराष्ट्राच्या लोकमानसात अपार प्रेम आहे. विशेषतः महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात सर्व लोककला जोपासल्या जातात. लोककलेच्या माध्यमातून मराठी माणसाची सांस्कृतिक व सामाजिक स्थाननिश्चिती करण्यासाठी लोकसाहित्याने मोलाची कामगिरी केलेली आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची :-

१ 'शरद व्यवहारे :'लोकधर्मी नाट्याची जडण घडण, नागपूर, १९९०.

२ शरद व्यवहारे : लोकसाहित्यः रंग आणि रेखा, नागपूर, १९९०

३ डॉ. चंद्रकांत व्यवहारे, मराठी शाहिरी वाङ्मयाचे स्वरूप, नागपूर, १९८८.

४ डॉ. मधुकर नंदनवार संपादक लोकनाट्य : दशा आणि दिशा, नागपूर, २०१२.